# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date: 18 November 2024
## Time: 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १८ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या परदेश दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात आज ब्राझीलमध्ये दाखल झाले असून, जी-*20* शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. ब्राझिलची राजधानी रिओ दी जेनेरिओ इथं पोहोचल्यानंतर पंतप्रधानांचं भारतीय समुदायाकडून जल्लोषात स्वागत करण्यात आलं. शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांच्या जागतिक नेत्यांसोबत स्वतंत्र बैठकाही होणार आहेत. एका न्यायसुसंगत आणि शाश्वत ग्रहाची, आणि पर्यायानं जगाची निर्मिती, असं यंदाच्या जी - *20* शिखर परिषदेची संकल्पना आहे. या परिषदेत ब्राझील सर्वसमावेशकता, गरीबी, शाश्वत विकास आणि जागतिक प्रशासन संस्थांच्या सुधारणा या मुद्यांना प्राधान्य देईल.

****

दरम्यान, ब्राझीलमध्ये होत असलेल्या जी - *20* परिषदेत भारतात गेल्या वर्षी झालेल्या जी - *20* परिषदेत अपुरं राहीलेलं काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा भारताचे शेर्पा अमिताभ कांत यांनी व्यक्त केली आहे. गरीबी आणि उपासमार यांच्याविरुद्धचा लढा, महिलांचं सक्षमीकरण, सर्वसमावेशक विकास या विषयांवर गेल्या जी - *20* परिषदेत चर्चा झाली असली, तरीही त्यावर सर्व देशांचं एकमत झालं नव्हतं. या चर्चा यावेळी पुढे सुरु राहतील. या मुद्यांवर सर्व देशांचा सहभाग आवश्यक असल्याचं कांत यांनी सांगितलं. ब्राझीलमधल्या जी - *20* परिषदेचं यश सर्व देशांच्या सहमतीवर अवलंबून असल्याचं ते म्हणाले.

****

मणिपूर मधल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज बैठक घेणार असून, सुरक्षेबाबत चर्चा करणार आहेत. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश गृह मंत्रालयाकडून देण्यात

आले आहेत. राज्यात जालेल्या हिंसाचारात अनेक जण मृत्यूमुखी पडले असून, यामध्ये सामील असणार्या दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असं मंत्रालयानं सांगितलं आहे.

****

उत्तराखंडमधल्या श्री बद्रीनाथ धामचे दरवाजे कडक हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर काल रात्री बंद करण्यात आले. त्यानिमित्त काल बद्रीनाथ मंदिर १५ क्विंटल झेंडूच्या फुलांनी सजवण्यात आलं होतं. मंदिराच्या सिंहद्वार संकुलात गढवाल स्काऊट बँडतर्फे वंदन करण्यात आलं.

****

राज्यातल्या २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार आज संपत असून, येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्यातल्या नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी, एक लाख ४२७ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रशासनाकडून निवडणुकीची संपूर्ण तयारी झाली असून, राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. गडचिरोली जिल्ह्यातल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर वायुसेनेच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं मतदान पथकं रवाना होत आहेत.

****

राज्यातली कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते रणदीप सुरजेवाला यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या, लॉरेन्स बिश्नोई टोळीनं बॉलिवुड अभिनेत्यांना दिलेल्या धमक्या इत्यादी प्रकरणांकडे त्यांनी लक्ष वेधलं आणि या सगळ्याला महायुतीच्या नेत्यांचा पाठिंबा असल्याचा आरोप त्यांनी केला.

****

नाशिक जिल्ह्यात सिन्नर विधानसभा मतदारसंघातले महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार शरद शिंदे यांची पक्षाने हकालपट्टी केली आहे. ते पक्षाचे उमेदवार नाहीत असंही स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाने शिंदे यांना उमेदवारी दिली होती, मात्र ते पक्ष शिस्तीचं पालन करत नसून, पक्षाच्या नेत्यांना विश्वासात न घेता चुकीच्या पद्धतीने प्रचार करत आहेत, त्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याचं,

पक्षाचे उत्तर महाराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर थोरात यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

****

विशेष पोलीस निवडणूक निरीक्षक दीपक मिश्रा यांनी काल नांदेड आणि लातूर जिल्ह्याचा निवडणूक विषयक तयारीचा आढावा घेतला. प्रत्येक अधिकारी, कर्मचार्यांने संवेदनशिलतेने निवडणुकीचं काम करावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

****

गडचिरोली जिल्ह्यात निवडणूक कामात हयगय करणाऱ्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गडचिरोली विधानसभा मतदारसंघात पोर्ला इथले क्षेत्रीय अधिकारी राकेश मडावी प्रशिक्षण सत्रास अनुपस्थीत होते, त्यामुळे मतदान यंत्र तयार करण्याच्या कामात व्यत्यय निर्माण झाल्यानं, ही कारवाई करण्यात आली.

****

महिलांच्या आशियाई चषक हॉकी स्पर्धेत काल भारताने जपानवर तीन - शून्य अशी मात करत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. बिहारमध्ये राजगीर इथं हा सामना झाला. भारताच्या नवनीत कौर आणि दीपिका कुमारी यांनी उत्कृष्ट खेळ करत विजय मिळवून दिला. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मंगळवारी भारताची लढत पुन्हा जपानशी होणार आहे.

****